म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय क्षा वा.
दा. क्र. २३८६

२३८६

# प्रो. लिखीते

IRBK-0102386
IRBK-0102386

यशोधन कृष्णा

महाराष्ट्र ग्रंथ भांडार प्रकाशन




म. ग्रं. सं. ठाणे
विषय वाङ्‌मय
वा. नं. २२१

ठा. ग्र. - २३८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०२३७

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. २३८६ नों. दि. ...
वि. ... भा. ...

IRBK-0102386

# प्रो. लिखिते

यशोधन कृष्ण

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

. . प्रकाशक . .
शंकर वामन कुळकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
. . मुंबई ४. . .

माझ्या छोट्या रश्मीस—

★

(सर्व हक्क प्रकाशकाधीन)

किंमत ६ आणे

प्रथमावृत्ति १९४६

. . मुद्रक— . .
आनंद ज. देशपांडे
लोकल प्रिंटिंग प्रेस
फोर्ट..........मुं ब ई.

# ओळख

रोज सकाळीं नियमानं फिरायला जाणं हा माझा सर्वांत आवडता व्यायाम. रॉक्सी सिनेमाच्या समोर चौपाटीवर जाण्यासाठीं जो रेल्वेचा पूल आहे तो ओलांडून मग सरळ मलबारहिलच्या पायथ्यापर्यंत जाणं मला नेहमींच आवडत असे. रोजच्याप्रमाणें त्या दिवशींही मी माझ्या मंद गतीनं चाललो असतां माझ्यापुढें एक व्यक्ति चालली होती. त्या व्यक्तीनें थंडीच्या दिवसांत घालतात तसला, गरम कापडाचा लांब डगला घातला होता व डोक्यावर साहेबी टोपी होती. तो माणूस बहिरा असावा असं मला वाटलं. कारण पाठीमागून येणाऱ्या एका धडधडत्या बसच्या हॉर्नचा आवाज त्याला ऐकूं आला नाहीं आणि मी जर त्याच्या त्या डगल्याला धरून खेचलं नसतं तर खात्रीनें ती स्वारी बसखालीं सांपडून चेंदामेंदा झाली असती आणि मग तुम्हांला माझी ही गोष्ट ऐकायलाही मिळाली नसती. त्या माणसाचा माझ्यामुळे जीव वांचला हें पाहून त्यानें माझे मनापासून आभार मानले. त्याच्या डोळ्यांत कृतज्ञता भरली होती.

"तुम्ही नसतात तर आज या जगाला मुकलों असतों !" तो अगदीं गहिंवरून म्हणाला.

त्या माणसानं नंतर मला माझं नांव विचारलं. व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं मला आपल्या घरीं रविवारचं जेवणाचं निमंत्रण दिलं. हा

माणूस उंच असून फार देखणा होता. त्याच्या बोलण्याची छाप माझ्यावर त्यानें चांगलीच बसवली होती व त्याचं तें आग्रहाचं निमंत्रण मला नाकारतां येण्यासारखं नव्हतं.

"बरं कां यशोधन, जरूर जरूर यायचं हं! रविवारीं दुपारी १ चे सुमारास." त्यानें माझा हात स्वतःचे हातांत घेत व प्रेमानं आवळीत, म्हटलं.

मी "हो" म्हणालों व त्या गृहस्थाचा पत्ता विचारला.

लागलेंच त्यानं आपल्या नांवाची चिठ्ठी काढली व माझ्या हातीं दिली.

| |
|---|
| प्रो. लिखिते, डी. एस्‌सी.<br>निळा बंगला,<br>मलबारहिल, ८ मुंबई. |

मी त्या चिठ्ठीवरील मजकूर वाचला. ती जपून कोटाच्या वरच्या खिशांत ठेवली व प्रोफेसर साहेबांचा निरोप घेऊन घरची वाट चालूं लागलों.

रविवारीं सकाळीं जाड्या आणि रड्याचा 'सकाळचा शो' पाहिला व तसाच प्रो. लिखिते यांचे घरी जाण्यास उशिर होऊं नये म्हणून बस गांठली. मलबार हिलच्या पायथ्याशीं उतरून मी निळ्या बंगल्याकडे वळलों. बंगल्याच्या सभोंवार अतिशय सुंदर अशी बाग होती. बागेचं फाटक उघडंच होतं. फाटकांतून आंत शिरल्यावर कारंज्याला वळसा घेऊन मी प्रो. लिखित्यांच्या बंगल्याजवळ आलों. बंगला

फारच सुंदर होता. त्याचा रंग आकाशासारखा निळा निळा होता. खिडक्यांना, दरवाज्यांना निळे पडदे लावलेले होते. मुख्य दरवाजा लोखंडी असून तो उघडा होता परंतु त्याच्या आंत कांचेचा एक मोठा दरवाजा होता. मी त्या दरवाज्याजवळ गेलों व कुणी येऊन तो उघडील कीं काय याची वाट पाहात राहिलों. पण कोणीच आलें नाहीं. दारावर निदान घंटा असेल असं वाटलं, पण तीही नव्हती. मी मग दरवाजा स्वतःच उघडावा ह्या हेतूनें दरवाज्याजवळ गेलों आणि काय चमत्कार? तो दरवाजा मी हात न लावतां आपोआप उघडला गेला व मी आंत शिर तांच तशाच तऱ्हेनें बंद झाला. थोडंसं अंतर चालून गेल्यावर मी डावी-कडे वळणार तोंच प्रो. लिखिते माझ्याकडे आले व त्यांनीं माझं आदरानं स्वागत केलं. मला त्यांनीं त्यांच्या खास दिवाणखान्यांत नेलं. तेथील सुबक टेबलं खुर्च्या आणि सजावट फार मनोहर होती. प्रो. लिखिते खूप खूप श्रीमंत असावेत याची मला खात्री पटली. परंतु मघा जो दरवाजा आपोआप उघडला व बंद झाला तो चमत्कार माझ्या मनांत सारखा घोळत होता. जेवणाच्या वेळीं दुसरं तिसरं कांहीं न विचारतां मी प्रोफेसर साहेबांना याबद्दल विचारलं, तेव्हां ते खूप मोठ्यानें हंसले आणि म्हणाले,

"इथं तुम्हाला या पेक्षांही मजेदार चमत्कारी आज पाहुला मिळणार आहेत; पण त्यामुळं तुम्हीं बावरून जाण्याचं कारण नाहीं. कारण तुम्हीं माझे उपकारकर्ते आहांत. माझ्या प्राणाचं दान तुम्हीं मला केलं आहे. मी एक शास्त्रज्ञ आणि जादुगार आहे."

आणि खरोखरच प्रो. लिखिते हे खरेखुरे जादुगार आहेत. हें तुम्हांला लवकरच कळून येईल. ते तसे फार चांगले माणूस आहेत. स्वभावानें

अत्यंत विनोदी आहेत. मुलं त्यांना फार आवडतात. मुलांची गम्मत करणं, जादूनें थोडा वेळ त्यांना फुलपांखरं करून या झाडावर त्या झाडावर उडायला लावणं, कुणा खट्याळ मुलाचे कान कोबीच्या पानासारखे लांब करणं, कुणाचे केस हिरवे करणं, अशी थोडा वेळ जम्मत करून मग त्यांना पूर्वीप्रमाणें मुलांत रूपान्तर करून घरीं पाठविणें हा त्यांचा नित्याचा उद्योग होता. शिवाय ते मोठे शास्त्रज्ञ असून 'अॅटम बॉंब' सारखा दुसरा एक 'बॉम्ब' तयार करण्याच्या विचारांत आहेत. मात्र या बॉम्बमुळें माणसं मरणार नाहींत—घरं पडणार नाहींत—आगी लागणार नाहींत, तर साऱ्या जगांत तो टाकल्यानंतर जगांतलीं दुष्ट माणसं तेवढीं पटापट मरणार असून सगळ्या पृथ्वीवर राहिलेल्या चांगल्या लोकांसाठीं विपुल धान्य, फळं आणि फुलं निर्माण होतील.

प्रो. लिखित्यांनीं जेवण तयार असल्याचं मला सांगितलं व आम्हीं दोघे जेवणाच्या खोलींत गेलों. खोलींत मध्यभागीं एक सुंदर निळ्या रंगाचं टेबल होतं, त्यावर निळं वस्त्र घातलं होतं. मात्र त्याचा रंग थोडा फिक्कट होता. मी आजुबाजूला पाहिलं. भिंतीवर दोन मळी-मोठीं चित्रं दिसत होतीं. पण तीं चित्रं रंगवलेलीं नसून रेशमाच्या निरनिराळ्या रंगाच्या धाग्यांनीं तयार केलीं होतीं. आपण त्याला भरतकाम कीं कायसं म्हणतोना तसंच. एक चित्र, दोन माणसं एक घर बांधित आहेत असं होतं. दुसरं एका शिकारी माणसाचं होतं. शिकाऱ्याच्या हातात धनुष्यबाण होता. व एक कुत्रा त्याचे पुढे चालत होता. मला तीं चित्रं फार आवडलीं. पण एवढ्यांत त्या तिथं एक चमत्कार झाला. हीं चित्रं साधी आपण बाजारांत पाहतों अगर आपल्या घरीं पाहतों तशी नव्हतीं. कारण त्या चित्रांचे रंग आणि देखावे पालटत असावे

असं मला दिसलं. कारण पहिल्या चित्रांतली दोन माणसं मचाशीं खालचा मजला बांधित होतीं. आतां त्यांनीं दुसऱ्या मजल्याच्या भिंती बांधायला सुरवात केली होती. दुसऱ्या चित्रांतील शिकाऱ्यानें आतां



एक पक्षी मारल्याचें दिसत होतं व त्याच्या कुत्र्याच्या तोंडांत २ ससे लोंबत असल्याचं पाहिला मिळत होतं. खरोखरच हा मोठा चमत्कार होता. प्रोफेसर साहेब जादुगार आहेत असं त्यावेळीं मला कळलं म्हणून बरं, नाहींतर भीतीनें मी पळतच सुटलों असतों.

तिथलं कोरींव लाकडी सामानसुद्धां मोठं चमत्कारिक होतं. पुस्तकांचं एक कांचेचं कपाट होतं, त्यांत पुस्तकं एक एक फूट उंचीचीं होतीं. एवढीं मोठीं पुस्तकं मी जन्मांत पाहिलीं नव्हतीं. शिवाय तेथें एक तांब्याचं टेबल होतं. त्यावर एक स्फटिकाचा गोळा होता. खोलींत दुसऱ्या अनेक चमत्कारिक गोष्टी होत्या. मला त्यांचीं नावंहीं सांगतां येणार नाहींत. उजेड येण्यासाठीं जे दिवे होते त्यांना निरनिराळ्या फळाचे आकार होते. खोलींतील वातावरण बाहेर जरी भयंकर उकाडा होता तरी अगदीं थंड होतं.

"अच्छा, श्री. यशोधन" प्रो. लिखिते म्हणाले—"आपण आतां सुरवात करूं या. दोन्ही तऱ्हेचं जेवण इथं तयार आहे. हिंदी आणि पाश्चात्य तऱ्हेचं."

"कुठलंही चालेल," मी म्हणालों.

"मग दोन्हीं मागवूं." ते म्हणाले.

मला वाटलं प्रो. साहेब जवळच्या हॉटेलांतून आतां हे सर्व पदार्थ मागवणार. कारण जेवण तयार असल्याची पूर्व तयारी तेथें कांहींच दिसत नव्हती.

"पण हें पहा," ते पुन्हां म्हणाले—"मी जसं रोज जेवण घेतों व ज्याप्रमाणें तें माझ्या पुढ्यांत वाढलं जातं तसं तुम्हांला चालेल ना?

माझी खात्री आहे मी जादुगार आहे हें आपणाला कळल्यावर कोण त्याही गोष्टीची अगर चमत्काराची तुम्हाला भीति वाटणार नाहीं."

छे छे! मी झोकांत म्हणालों.

इतक्यांत वरच्या छतावरून एक भला मोठा साप सरसर खालीं आला. माझं अंग एकदम शहारलं. पण मी धैर्यानें आलेल्या संकटांना तोंड देण्याचं ठरविलं. तो सर्प खूपच लांब होता आणि त्याला आठ हात होते. त्या सापानें जवळच्या कपाटाचा खण उघडला. त्यांत असलेला शुभ्र टुवाल काढला व आपले हात पुसले. नंतर त्यानें दुसरा खण उघडून त्यांतल्या बशा, कांटे, चमचे, झपझप टेबलावर मांडले. इतक्या जलद हें काम त्यानं केलं कीं, मी आश्चर्यानें स्तंभित झालों. एखाद्या हुशार नोकरालाही हें काम जलद व सफाईनें करतां आलं नसतं.

"हा माझा नोकर अमर" प्रो. लिखिते म्हणाले. "माणसोपक्षां हा नोकर मला फार आवडतो. कारण त्याला आठ हात आहेत, तो फार जलद काम करतो. त्याच्या हातून कांचेचीं भांडीं सहसा खाली पडून फुटत नाहींत."

मी अमरच्या आगमनानं इतका भांबावून गेलों होतों कीं, मला कसलंच भान राहिलं नव्हतं. एखाद्या वेड्या माणसासारखा मी तेथील घडणाऱ्या साऱ्या प्रकाराकडे पाहात होतों. खोलींतलीं तीं मघाचीं चित्रें आतां बरींच बदललीं होतीं. तो शिकारी तेथें नव्हता. त्या जागीं हरिणांचा एक कळप धांवतांना मला दिसला. घरं बांधणारे ते मजूर विडीचा झुरका मारतांना तेथेंच एका पडलेल्या लाकडाच्या ओंडक्यावर बसलेले होते.

प्रो. लिखिते यांच्या डोक्यावर मात्र त्या दिवसांची ती हॅट होती. जेवतांना त्यांनीं ती कां काढू नये याचं मला आश्चर्य वाटलं आणि त्याच टोपींनं मला आवडणारे पदार्थ पुरविले.

बशा मांडून आल्यावर प्रो. लिखित्यांनीं ती हॅट तेथें असलेल्या ग्लासीसवर ठेवली. प्रथम एकावर, मग दुसऱ्यावर, मग तिसऱ्यावर असें करीत त्यांनीं सर्व ग्लासवर ती हॅट फिरवली व पुन्हां डोक्यावर ठेवली. काय आश्चर्य ? तीं रिकामीं ग्लासं निरनिराळ्या पेयांनीं भरलीं. नारंगीचा रस, मोसंबीचा रस, द्राक्षाचं सरबत, डाळिंबाचं सरबत, अननसाचं सरबत, "अरे वा: काय ही गम्मत!" मी म्हणालों.

"अरे हो, पण तुम्हांला दूधही हवं असेल!" प्रो. लिखिते म्हणाले, आणि त्यांनीं "कपिला इकडे ये." असं म्हटलं. त्याबरोबर एक छोटी हिरवी गाय बाहेरच्या दालनांतून आंत आली. सरळ आमचे टेबलावर उभी राहिली व प्रोफेसरांनीं तिचं दूध काढून दोन ग्लासं भरलीं व तिच्या पाठीवर प्रेमानं थापटीत तिला जाण्यास सांगितलं.

तें दूध फारच छान होतं. त्याची चव अद्याप माझ्या जिभेवर आहे.

प्रोफेसर लिखित्यांनीं नंतर आपली टोपी रिकाम्या बशांवर पाळी-पाळीनें ठेवली आणि पुन्हां फिरून ती डोक्यावर ठेवतांच टेबलावरील सर्व बशा पदार्थांनीं भरून गेल्या. कांहींत विलायती पद्धतीचे पदार्थ होते. केक्स, पुडिंग, कस्टर्ड, सँडविचीस, पॅटिस, कटलेट्स, आमलेट, आइसक्रीम तर कांहींत लाडू, करंज्या, चकल्या, अनरसे इत्यादि. ते पदार्थ पाहूनच माझं पोट भरलं. पण प्रोफेसर साहेबांनीं मला फार आग्रहानं सारे पदार्थ खायला लावले.

"आतां आपण एक छानसा पदार्थ मागवूं. नाहीं, तयारच करायला लावूं. तुम्हीं मासे खातांना?" प्रोफेसरांनीं मला प्रश्न केला.

मी म्हटलं "होय"

"अच्छा," प्रोफेसरांनीं एक हात मांडीवर आपटीत म्हटलं व त्यांनीं अमरला पुन्हां हाक मारली.

त्या चित्रांत आतां पुन्हां बदल झाला होता. हरणांचा कळप नाहींसा होऊन तेथें एक छानसं तळं दिसत होतं.

अमरनें हातांत एक गळ घेतला व त्या चित्रांतल्या तळ्यांत फेंकला. थोड्या वेळानें त्या गळाला एक सुंदर सोनेरी मासा लागला. त्या माशाची चांगली आमटी करण्यासाठीं प्रोफेसर साहेबांनीं दुसऱ्या एका नोकरांस हाक मारली. तो नोकर पाहून मी पुराच सर्द झालों. त्याचं नांव होतं पंकज.

हा नोकर म्हणजे एक छोटंसं पांढरं अस्वल होतं. अस्वल आणि आग यांचं कधींच सख्य नसतं पण या अस्वलाच्या तोंडांतून व शेपटींतून ज्वाला येत होत्या पण त्याच्या अंगावरचे केस मात्र जसेच्या तसेच होते.

"पंकज, ती शेपटी वर उचलून घे, नाहींतर पायाखालचा गालीचा जाळशील" लिखिते ओरडले. त्यांनीं नंतर त्या अस्वलास तो मासा शिजवण्यास सांगितलं. त्यानं तो आंत नेला व मग त्याची मसालेदार आमटी केली. ही आमटी शिजविण्यास त्या अस्वलानं आपल्या तोंडांतल्या ज्वाळांचा उपयोग केला.

वास्तविक अस्वलाच्या तोंडांत आग क्वचितच दिसते. साधारणपणें 'ड्रॅगन' नांवाचा जो एक भयंकर साप असतो त्याच्या तोंडांतून, नाकांतून फार भयंकर ज्वाला येत असतात. त्यानं कित्येक वेळां जंगलेंच्या जंगलें पेटलेलीं आपणांस माहित असेल. एकदां तर एका ड्रॅगनपुढें चीनचा भला राजवाडाच भस्मसात् झाला.

त्या माशाच्या आमटीबरोबर आम्हीं भात संपविला. भातासाठीं वापरलेले तांदुळ अति बारीक व चवदार होते. रेशनिंग सुरू झाल्यापासून असा भात मला खायला मिळाला नव्हता. माझं जेवण जवळजवळ संपलं होतं. आणि आमच्या गप्पा सुरु होत्या.

"आजच्या ह्या चमत्कारी जेवणामुळं आपण थोडेसे दिङ्मूढ झाला असाल नाहीं!" प्रोफेसर म्हणाले.

"हो" मी म्हणालों,

"हे जे दोन प्राणी तुम्हांला दिसले त्यांचा मोठा इतिहास आहे." ते म्हणाले.

"काय तो!" मी अधिरतेनें प्रश्न केला.

"आतां प्रथम तुम्हीं जो साप पाहिलात ना, तो एक माणूस होता. मी गेल्या पावसाळ्यांत दादर येथें रेल्वेनें जात असतां एका माणसाला आमच्या गाडीखालीं अपघात झाला व गाडीखालीं एक माणूस सांपडला. त्या दुर्दैवी माणसाचे दोन्ही पाय तुटले होते. या माणसाला मी माझ्या ताब्यांत घेतलं. लोकांना त्यावेळीं मी खोटंच सांगितलं कीं, तो माझा नातेवाईक आहे व त्याची वासलात लावण्याचा हक्क मला आहे. लोकांची गर्दी कमी झाली. तो दुर्दैवी माणूस व मी एकटा राहिलों. आजुबाजूला कोणी नाहीं असं पाहून मी त्या माणसाला एकदम लहानशी गोगलगाय बनवलं व माझ्या खिशांतून त्याला घरीं आणलं. त्यानंतर मी त्या गोगलगाईचा साप केला. कारण त्या माणसाचे पाय गेले होते व बिनपायाच्या प्राण्यांतच त्याचं रूपांतर मला करतां येणं शक्य होतं. अर्थात् सरपटणाऱ्या प्राण्यांत सापाची गणना होत असल्यानं मी त्याला साप केला व त्याचं नांव अमर ठेवलं.'

मी ही हकिगत ऐकून त्यांना प्रश्न केला कीं, "तुम्हीं जर त्याला साप करू शकलांत तर त्याला त्याचे पाय देऊन त्याला मनुष्य म्हणून सुखानं जगूं देतां आलं नसतं काय ?"

"नाहीं." ते म्हणाले, या जन्मीं त्याला लुळेपणांतच जीवन कंठावं लागलं असतं. कारण पूर्वजन्मीं त्याच्या हातून दुसऱ्या माणसास पंगू करण्याचं पाप घडलेलं आहे."

"तें कसं काय ?"

"या माणसानं काळ्या बाजारांत खूप पैसा मिळवला. गरीब लोकांना छळलं आणि काळ्या बाजारावर मिळवलेल्या पैशानं यानं एक मोटार घेतली. त्या मोटारीखालीं एक गरीब मजूर सांपडला व त्याचे पाय तुटले. ईश्वरानं त्याबद्दल त्याला ही शिक्षा दिली आहे व ती त्याला भोगलीच पाहिजे."

"ईश्वर खरोखरच न्यायी आहे." मी उद्गारलों.

"दुसरा प्राणी म्हणजे तें आंतलं अस्वल. हें अस्वल मला एका रशियन मित्रानं भेट म्हणून दिलं. हा माझा रशियन मित्र माझ्याप्रमाणंच मोठा शास्त्रज्ञ आहे. किमियागार आहे. हें अस्वल पूर्वी एक जर्मन शिपाई होता. या शिपायानं मॉस्कोच्या लढाईत अति क्रूर कृत्यें केलीं. एका रशियन अर्भकास त्यानं पेटत्या खाईत मजेखातर फेकून दिलं होतं. आणि त्याबद्दल माझ्या त्या रशियन मित्रानं याला अस्वल बनवलं. व त्याच्या सर्व अंगांत अग्नि निर्माण केला. त्या अग्नीनं त्याला किती दुःख होत असेल याची त्यालाच कल्पना. रडत असतो बिचारा तो पंकज. पण पापाचं प्रायश्चित्त घेतलंच पाहिजे."

प्रोफेसर साहेबांचं जेवण चालू होतं. माझं पोट मात्र गच्च भरलं होतं. त्यांनीं एक कोंबडी मागवली. पंकजनं भरलेली कोंबडी त्यांच्यापुढे ठेवली, पण तिला मीठ कमी पडलें होतें म्हणून मीठ मागितलं व मिठाचं छोटंसं भांडं घेऊन एक तिसराच नोकर घाईघाईनें पुढें आला. हा एक छोटासा चतूर होता. त्याला छोटेसे निळे पंख होते व एक लांब चोंच होती. याला प्रोफेसर हाक मारीत चिमण. चिमण बराच धडपड्या दिसला. त्यानं मिठाचं भांडं टेबलावर नीट ठेवण्याऐवजीं तें उपडं केलं व त्यांतलं सगळं मीठ खालीं सांडलं. प्रोफेसर लिखिते त्यामुळें फार रागावले व त्यांनीं तें मीठ भरण्यास त्यास सांगितले. बिचारा चिमण आपल्या छोट्याशा सोंडेनें तें मीठ कसं भरणार! एक एक कण भरतां भरतां तो अगदीं थकून गेला. घामाघूम झाला.


"हा चतूर रूपी चिमण पूर्वी एक भामट्या होता. लोकांना फसविणें, खिसे कापणें, चोऱ्या करणें, असलीं घाणेरडीं कृत्यें तो करी आणि एकदां एका मोठ्या गुन्ह्याबद्दल पोलीस त्याचे पाठीस लागले असतां याला मीं आश्रय दिला. पोलिसांनीं जर त्याला पकडलं असतं तर बिचारा काळ्या पाण्यावरच गेला असता. मीं आतां त्याला चतूर केलं आहे."

प्रो. लिखित्यांचं जेवण आतां पुरं झालं. मग त्यांनीं थोडी फळ-फळावळ खावीं या उद्देशानं मला विचारलं "कोणतीं फळं तुम्हांला चालतील?"

"कोणतींही" मीं म्हणालों.

लिखित्यांनीं नंतर आम्ही बसलेल्या टेबलाच्या चारी कोपऱ्यावर आपल्या हातांतील चमच्यानें टकटक असा आवाज केला. क्षणार्धांत त्या

चारी कोपऱ्यावर छोटी रोपटीं उगवलीं. व मिनिटा अर्ध्या मिनिटांत;



त्याचीं झाडें झालीं. एक आंब्याचं होतं, दुसरं सफरचंदाचं, तिसरं

संत्र्याचं व चवथी वेल होती काबुलीद्राक्षांची. त्या झाडाचीं तीं फळे आम्ही काढलीं व पोटभर खाल्लीं. द्राक्षांचा तर मी किती फडशा उडवला त्याचा हिशेबच नाहीं.

आमचा फलाहार संपल्यावर आम्ही तेथून उठलों व वरच्या मजल्यावर असलेल्या दुसऱ्या एका प्रशस्त दालनांत गेलों. प्रो. लिखिते आतां अगदीं बेचैन दिसले. ते कुणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत होते.

"कुठं गेला हा अबदुल मजीद !" ते स्वतःशींच म्हणाले.

येवढ्यांत त्या दालनांत चकचकीत प्रकाश पडला व विमानासारखा आवाज आला व निमिषांत एक सुरेखसा गोरा माणूस प्रोफेसर साहेबांच्या समोर येऊन दाखल झाला. त्याच्या पाठीवर सोनेरी पंख होते व त्यानें ते आतां मिटून घेतले होते.

"किती उशीर केलास मजीद, पाहुण्यांना किती खोळंबून ठेवायचं !" लिखिते म्हणाले.

"माझा इलाज नव्हता." अबदुल मजीद असाह्य होऊन म्हणाला. "प्रथम मी इराणला गेलों. पण तिथं मनासारखे गालीचे मिळतच ना. थोडा वेळ धांवपळ करून शेवटीं एक सुंदर गालीचा मिळाला तो घेतला व लंडनला उडालों."

"कशासाठीं ?" प्रोफेसर साहेबांनीं प्रश्न केला.

"पाहुण्यासाठीं तिथं काय चांगल्या वस्तु मिळतात कीं काय तें पाहण्यासाठीं."

"लंडनला कसल्या आल्या आहेत चांगल्या वस्तु ? सध्यां तिथं कोळसे, पडक्या इमारतीचे अवशेष दिसायचे डोळ्यांना. आहे काय दगड !" लिखिते म्हणाले.

"आणि मी सुद्धां लंडनला उतरलों नाहीं. कारण लंडन शहरावर आज इतकीं कांहीं विमानं घिरट्या घालीत होतीं कीं, मी उतरण्याचा प्रयत्न करणं म्हणजे माझा जीव धोक्यांत घालण्यासारखं होतं. "बरं मग पुढें कुठं गेलांत ?" मी त्याला प्रश्न केला.

"त्यानंतर मी बँकॉकला गेलों. विमानांचा आणि वाटेंत येणाऱ्या वेधशाळांचा त्रास चुकविण्यासाठीं मी आकाशांत पांच मैलांच्या उंचीवरून उडत होतों. बँकॉकला पोंचल्यावर टोयोमेका या व्यापाऱ्याला भेटून आपण सांगितलेला हिरा खरेदी केला. त्या वेळेला येथें परतण्यास थोडासा अवधि होता म्हणून जाता जातां परिस्थिति पाहावी म्हणून त्या बाजूस वळलों."

"मग काय पाहलं जपानांत, अमेरिकन निशाणं ?"

"छट् मी तिकडे गेलोंच नाहीं. जपानची राजधानी पाहण्यापेक्षां विचार केला हिरोशिमाच बघावं. अरेरे काय ती हिरोशिमाची स्थिति मालक, हिरोशिमांत एक सुद्धां घर उभं नव्हतं. सारा प्रदेश उजाड आणि बेचिराख दिसत होता." अबदुल मजीदच्या डोळ्यांत आसवं आलीं. तो पुढें म्हणाला, "मालक ! जग सुधारलं सुधारलं असं जें आपण म्हणतों तें खोटं आहे. ज्या जगांत स्वार्थासाठीं, संपत्तीसाठीं, सत्तेसाठीं माणसं माणसाला ठार करतात, निरपराध बायका-मुलांची कत्तल करतात तें जग सुधारलं असं कोण म्हणेल ? जग माझ्या मतें आतां रानटी अवस्थेला चाललंय."

अबदुल मजीदचं म्हणणं खरं होतं. आम्हां दोघांना ह्या देवदूताचे शब्द पटले. अबदुल मजीद हा देवदूत होता आणि प्रो. लिखित्यांनीं त्याला प्रेमानं आपला बनवलं होतं.

अबदुल मजीद त्यानंतर झपाट्यानें आकाशांत उडून गेला.

प्रोफेसर साहेबांनीं भेटीदाखल मला तो गालीचा दिला. गालीच्यावर सुंदर कलाकुसरीचें काम केलं होतं. त्यांत दाखविलेले निसर्गाचे सारे देखावे अगदीं खऱ्यासारखे वाटत होते. प्रो. लिखित्यांनीं मला गालीचा पसंत पडल्याचें पाहून त्याचं एक पुडकं तयार केलं व माझ्या स्वाधीन केलं. बोटांत मी ती बँकॉकच्या हिऱ्याची आंगठी घातली. हिरा फारच मौल्यवान् व चकचकीत होता. आंगठीची घडण आपल्या देशांतली होती; कारण आपल्या देशाइतके उत्कृष्ट कलावंत दुसऱ्या देशांत क्वचितच असतील. ताजमहाल हा फक्त हिंदुस्थानांतच निर्माण झाला व तो दुसरीकडे कुठेंही होणार नाहीं.

साडेतीनचा सुमार झाला होता. प्रो. लिखित्यांची मेजवानी मला फारच आवडली. प्रो. लिखिते मला निरोप देण्यासाठीं बंगल्याच्या मुख्य दरवाजापर्यंत आले. मी त्यांचे फार फार आभार मानले. प्रो. लिखित्यांनीं मला पुन्हां केव्हां तरी येण्याचा आग्रह केला व त्यांची विनंति मी मान्य केल्याचं हंसून व्यक्त केलं. प्रो. लिखित्यांना जातां जातां मी "जय हिंद" म्हटलं. मी बागेचें फाटक ओलांडून रस्त्यावर आलों. मागें वळून पाहिलं तों प्रो. लिखिते तेथें नव्हते. मात्र तो निळा बंगला आतां संगमरवरी दगडाप्रमाणें पांढरा शुभ्र झाला होता.

# पुन्हा एक दिवस

जवळ जवळ दोन महिन्यांत मी प्रोफेसरसाहेबांस भेटलों नव्हतों. सकाळच्या रपेटींत कदाचित त्यांची माझी भेट होईल असं मला वाटलं होतं पण तसं कांहीं झालं नाहीं. मी स्वतःहून प्रोफेसरसाहेबांच्या घरीं जावयाला भीत होतों. न जाणों आपण त्यांच्या घरीं गेलो आणि ते घरीं नसले तर त्यांच्या नोकरांचाकरांमुळें भयंकरच प्रसंग यायचा! प्रत्यक्ष प्रोफेसरसाहेब माझ्या शेजारी असले म्हणजे त्यांच्या त्या सर्परूपी अमरचं अगर अस्वलरूपी पंकजचं मला भय वाटलं नसतं, पण त्यांच्या गैरहजेरींत अरे बापरे कल्पनाच करवत नाहीं. प्रो. लिखित्यांना भेटावं असं मला सारखं वाटत होतं व रोज फिरायला जातांना मी आजुबाजूला ते दिसतात किंवा काय यासाठीं मोठ्या आशाळभूतपणें पाहात असे.

पण प्रो. लिखित्यांकडे जाण्याचा योग अचानक आला. दिवाळीचे दिवस होते. बलिप्रतिपदेच्या दिवशीं मी लवकर उठून अभ्यंगस्नान वगैरे केलं व वर्तमानपत्र हातीं घेऊन ते माझ्या अभ्यासाच्या खोलींत जाऊन वाचावं या हेतूनं मी माडीवर गेलों तों काय आश्चर्य ? माझ्या टेबलावर एक छानसं कागदांत बांधलेलं पार्सल व त्यावर एक माझ्या नांवाचा लिफाफा दिसला. मी घाईघाईनं तो फोडला व आंतील पत्र वाचलें. पत्र आणि पार्सल प्रो. लिखिते यांचेकडून आलेलं होतं.

तारीख २०-१०-१९५९

प्रिय यशोधन,

बरेच दिवसांत आपणांकडून कांहींच समाचार कळला नाहीं. निदान आपण मला येऊन भेटाल असं वाटलं होतं पण माझा आपणाला विसर पडलेला दिसतो. आपण त्या दिवसाच्या माझ्या मेजवानीनं रागावलात तर नाहीं? रागावला नसाल तर उद्यां सकाळीं मला येऊन भेटाल. मला तुमच्या संगतींत उद्यांचा दिवस घालवावयाची इच्छा आहे. न्याहारीसाठींच येथें उद्यां जरी आलांत तरी चालेल. वाट पाहात आहे.

दिवाळीनिमित्त कांहींतरी भेट म्हणून एक जादूची डायरी, वाटेल त्या वेळीं अदृश्य होणारा रुमाल व एक हाताला लावण्याचं घड्याळ (ज्याला कधींच चावी द्यावी लागणार नाहीं असं) पाठवित आहे त्याचा स्वीकार व्हावा.

हिरवा बंगला,
मलबार हिल, मुंबई

आपला
**प्रो. लिखिते**

मी तें बंडल मोठ्या अधिरतेनं उघडलं. खरोखरच पत्रांत लिहिल्याप्रमाणें सर्व जिनसा फारच सुंदर व आकर्षक होत्या. घड्याळ मी माझ्या मनगटाला बांधलं. त्याची तबकडी सोनेरी होती व आंकडे रेडियमचे होते. प्रोफेसर साहेबांच्या पत्राप्रमाणं मी दुसरे दिवशीं त्यांचे घरीं जाण्याचा बेत मनाशी पक्का केला.

दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें प्रो. लिखित्यांचें घरीं गेलों. यावेळी त्यांचा बंगला माझ्या पहिल्या भेटीप्रमाणें निळा नव्हता किंवा पांढराही नव्हता. पत्रांत कोपऱ्यांत लिहिलेल्या पत्त्याप्रमाणें गडद हिरवा होता.

प्रो. लिखित्यांनीं मग माझ्या हातीं एक काळी कुळकुळीत टोपी दिली. ती फार हलकी होती व अत्यंत मऊ होती. जणूं काय नुकतंच जन्मलेलं गोंडस सशाचं पिल्लूं. मी ती डोक्यावर ठेवली आणि त्याचक्षणीं माझा उजवा हात दिसेनासा झाला. मग माझे सारे अवयव अदृश्य होऊं लागले. माझा मी मला दिसेना. मला बाकी सर्व जग दिसत होतं. पण मी स्वतः कुठं होतों कुणास ठाऊक! या प्रकारामुळें मी थोडासा गोंधळून गेलों थोडासा थकलोंही. स्वतःला सावरण्यासाठीं मी माझ्या अदृश्य हातांनीं तेथें असलेल्या तांब्याच्या टेबलाचा आधार घेतला पण थोड्या वेळांत सर्व कांहीं ठीक झालं. अदृश्य रूपानं मी नंतर प्रोफेसर लिखित्यांच्या सर्व बंगल्यांत फिरलों. बागेंत फेरफटका मारला.

"ती टोपी आतां तुम्हीं आपल्या खिशांत ठेवा व ज्यावेळीं तुम्हांला अदृश्य व्हायचं असेल त्यावेळीं तुमच्या स्वतःच्या हॅटखालीं ठेवा म्हणजे तुम्हीं कुणाला दिसेनासे व्हाल. चला आतां आपण बाहेर जाऊं या." प्रो. लिखिते म्हणाले.

आम्हीं बंगल्यांतून बाहेर पडलों. बाहेर रस्त्यावर आल्यावर माझी टोपी व माझा कोट आपोआप उडत आला व माझ्या अंगांत शिरला. टोपी माझ्या डोक्यावर बसली व ज्या खुंट्यावर ह्या दोन वस्तु टेवून दिल्या होत्या त्या परत बंगल्यांत गेल्या.

"पहिल्या प्रथम" प्रो. लिखिते मोटारींत बसतां बसतां म्हणाले. मी एका चावऱ्या कुत्र्याचा बंदोबस्त करायचं ठरवलंय. हा कुत्रा म्हणजे रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना मोठं संकटच झालंय. त्याच्या तावडींत जो जो सांपडेल त्याला तो चावतो. मुलांना तर त्याचा भयंकरच त्रास. कारण जवळपास मुलांची शाळा आहे व

बंगल्याच्या मुख्य दरवाजांत अबदुल मजीद उभा होता. त्यानंच या खेपेस माझं स्वागत केलं. माझी टोपी व कोट त्यानं खुंटीवर टेवण्या-साठीं मागितली व मी रुकार देतांच त्यानं माझा कोट व टोपी काढली पण कशी ? मला न स्पर्श करतां, माझ्यापासून जवळ जवळ सहा फूट दूर राहून. मला या विचित्र गोष्टीचं आश्चर्य वाटलं नाहीं. कारण मी चमत्कारांच्या घरांत आलों होतों.


प्रो. लिखित्यांनीं मी त्यांच्या खोलींत शिरल्याबरोबर माझं हंसून चांगलं स्वागत केलं. माझ्या आगमनानं पंकज व अमर यांनाही आनंद झाला.

"मला वाटतं आज आपण आपलं दुपारचं जेवण घ्यायला कुठंतरी परदेशांत जाऊं. तें न साधलं तर निदान काश्मिरला जाण्याचा माझा बेत ठरला आहे. पण त्यापूर्वीं मला एक दोन कामं आहेत तीं मी उरकून घेतों तोंवर तुम्हीं बसा. करमणुकीची सोय मी करतो. तें पसंत नसेल तर चला माझ्याबरोबर."

"मी आपल्या कामांत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय आणणार नाहीं अशी आपली खात्री असेल तर मी आपण न्याल तेथें यायला एका पायावर तयार आहे."

"छे! बिलकुल नाहीं. उलट आपल्या संगतीनं मला आनंदच वाटेल. पण त्यापूर्वीं तुम्हीं अदृश्य कसं व्हायचं तें मला तुम्हांला दाखवायला हवं. तुम्हीं ती काळी टोपी आहे ती डोक्यावर ठेवा. डोक्यावर ठेवतांक्षणींच तुम्हीं हळुहळू अदृश्य होऊं लागाल. तुम्हीं स्वतः कापसा-प्रमाणें हलके झालां आहांत असं तुम्हांला वाटेल व तुम्हीं हवेंत तरंगू लागाल. मात्र असं होत असतां कृपा करून थोडा वेळ खालीं पाहूं नका नाहीं तर तुम्हांला चक्कर येईल."

23६



( पान २० पहा. )

शाळेंत जाणाऱ्या पुष्कळशा मुलांना तो चावला आहे. त्याचा मालक, एक निर्दय माणूस असून त्या कुत्र्याचा त्यानं मुळींच बंदोबस्त केला नाहीं. मी काल असं ऐकलं आहे कीं, पोलीस त्या कुत्र्याला आतां गोळी घालून ठार करणार आहेत पण मला तें पसंत नाहीं. मी माझ्या जादूनेंच त्याची खोडकी मोडणार आहे. याशिवाय मी एक दोन मजेदार पण लोकोपयोगी कामं करणार आहे. एक मोठ्या रकमेचा चेक अदृश्य करणं हें माझं अत्यंत महत्त्वाचं आजचं काम आहे. ही गोष्ट करित असतांना तुमची मात्र भरपूर करमणूक होईल अशी मी अपेक्षा करतों."

मोटार चालतच होती. टॅक्सीवाला एक पारशी ड्रायव्हर होता. त्याच्या सर्व तोंडावर व मानेवर कसल्या तरी विचित्र पुटकुळ्या उठल्या होत्या. प्रो. लिखित्यांना त्याची कींव आली व त्यांनीं तोंडानें कसलासा मंत्र पुटपुटायला सुरवात केली आणि मंत्राचा उच्चार होतांच त्या मोटार ड्रायव्हरच्या चेहऱ्यावरच्या व मानेवरच्या पुटकुळ्या नाहींशा झाल्या. त्याचा चेहरा आतां टोमॅटो सारखा लाल व गुबगुबित दिसूं लागला.

आमचं उतरण्याचं ठिकाण आलं. आम्हीं मोटारमधून उतरलों. प्रोफेसर साहेबांनीं मोटारवाल्याच्या हातांत एक नाणं दिलं. मोटारवाल्याला तो फक्त रुपया आहे म्हणून तो गुरगुरून म्हणाला, "काय रुपया!"

प्रो. लिखिते म्हणाले, "नाहीं. नीट पहा."

आणिं त्या ड्रायव्हरनं पुन्हां त्या नाण्यांकडे पाहिलं तो काय? ती पांच रुपयाची नोट होती. तो चमत्कार पाहून मोटारवाला मनांत चरकला. त्यानं टॅक्सी वेगानं पळविली.

"आतां तुमची ती जादूची टोपी डोक्यावर घाला बरं का यशोधन ? कारण येथें माणसांची रहदारी फार कमी आहे आणि तुम्हीं अदृश्य होतांना तुम्हांला कुणी पाहाणार नाहीं. गर्दीमध्यें अदृश्य होणं फार धोक्याचं असतं एक तर तें लोकांच्या लक्षांत येतं व पाहाणारे त्यामुळें भयभीत होतात."

मी त्याप्रमाणें टोपी डोक्यावर ठेवली व क्षणार्धांत दिसेनासा झालों. प्रोफेसर साहेब मजकुरांनीं आपली छत्री आपल्या छातीजवळ नेली व ते देखील हवेंत विलीन झाले. त्यांच्या छत्रीची मूठ मात्र मला बाहेर दिसत होती. रस्त्यानं एकादा पक्षी उडत उडत जावा, तशी ती जात होती व तिच्या मागोमाग मी चाललों होतों.

"आतां तुम्हीं माझ्या मागें बागेंत या व मी त्या कुत्र्यांची खोडकी कशी मोडतो तें पहा." प्रोफेसर म्हणाले.

मी त्यांच्या मागें चाललों होतों. बागेंत शिरतांच तिचें फाटक मी बंद केलें. इतक्यांत एक भला मोठा मस्त कुत्रा आमच्या दिशेनें येतानां दिसला. त्याचा जबडा खूपच मोठा होता. व त्याचं तोंड एखाद्या रागीट माणसासारखं दिसलं. वास्तविक त्याला आम्हीं दिसत नव्हतों पण वासानेंच त्यानें आमचं अस्तित्व जाणलं असावं. तो कुत्रा आतां प्रो. लिखित्यांकडे धांवला. तो त्यांच्याकडेच पळत असावा हें त्यांच्या हातांत असलेल्या छत्रीच्या मुठीच्या हालचालीवरून कळून येत होतं. तो कुत्रा त्यांचेजवळ गेला असें पाहून ती मूठ जरा उंचावल्या सारखी झाली. व तिथें एक जांभळट रंगाचा धूर दिसला. त्या धुरांत तो कुत्रा अधिकच पिसाळला व हवेंतच चावण्याचा प्रयत्न करूं लागला. थोड्या वेळानं प्रो. लिखिते यांनीं आपला डावा पाय दिसेल असं केलं. त्या पायाचा त्या कुत्र्यानें कडकडून चावा घेतला. त्यानं चावण्यासाठीं जेव्हां त्याचा जबडा उघडला तेव्हां त्याचे दांत अत्यंत तीक्ष्ण असल्याचें मला दिसून आलें. मी अदृश्य होतों म्हणून ठीक, नाहींतर माझी भयानं काय स्थिति झाली असती कुणास ! त्या कुत्र्यानं लिखित्यांच्या पायाचा दांस घेतला पण त्याचे दात मात्र त्यांच्या मांसल पोटरींत शिरले नाहींत.

उलट त्याचे ते तीक्ष्ण व कठीण दात एकदम रबरासारखे नरम झाले. फक्त त्याच्या अगदीं आंतल्या चार दाढा पूर्वीप्रमाणें कायम राहिल्या




कारण अन्न खाण्यास त्याला त्या दातांची जरूरी होती. इतक्यांत त्या

कुत्र्याचा मालक बद्रुद्दीन तेथें आला. त्याला पाहातांच प्रो. लिखिते थोडा वेळ हवेंत उडाले व त्यांच्या पायाबरोबर तो कुत्राही हवेंत लोंबकळत राहिला. त्याचा मालक हा चमत्कार पाहून पोष्टाच्या पेटी-सारखं तोंड वासून उभा राहिला. प्रो. लिखित्यांनीं त्या कुत्र्याला एक जोराची लाथ मारली व तो जमिनीवर धाडदिशीं आपटला व केकरत पायांत शेपटी घालून पळून गेला. त्या कुत्र्याचे दांत त्या दिवसापासून रबरासारखे नरम झाले व त्याच्या चावण्यापासून लोकांना इजा होण थांबलं. मात्र अशा तऱ्हेचा रबरी दातांचा विचित्र कुत्रा जर त्याच्या मालकानं प्रदर्शनांत ठेवला व केवळ १ आणा फी ठेवली तरी तो हजारों रुपये सहज मिळवील असं मला वाटलं.

"आतां आपण मोतीबझारांत जाऊया. मला एका पेटीवर तुम्हांला न्यायचं आहे. या पेटीचा मालक सामळदास पंड्या हा एक दुष्ट मारवाडी आहे. त्याला मी अनेकदां त्यांच्या रक्तशोषी धंद्याबद्दल ताकीद दिली आहे. तरीसुद्धां त्यानं लोकांना कर्जाऊ पैसे देऊन भरमसाट पैसे उकळण्याचं बंद केलेलं नाहीं. पुष्कळदां हा गरीब, गरजू लोकांस पैसे देतो व त्याची त्या बिचाऱ्यांनीं तिप्पट चौपट करूनहि फेड केली तरी त्यांचं मुद्दल कायमच राहातं. आज त्याला चांगलाच हात दाखविणार आहें. एका भल्या मोठ्या रकमेचा त्याचा चेक मी अदृश्य करणार आहें." प्रो. लिखिते म्हणाले.

आम्हीं दुसरी एक मोटार बोलावली व तींत बसून मोतीबाजारचा रस्ता धरला.

मोटार सामळदास शेटच्या दारांत थांबली. प्रो. लिखिते अदृश्य रहाणार होते. मी मात्र दृश्य रहाणार असून कर्ज मागणारं एक

गिऱ्हाईक म्हणून जाणार होतों. आंत शिरतांच प्रोफेसर साहेब माझ्या मागून मागून येत होते. त्यांचं अस्तित्व त्यांच्या छत्रीच्या मुठीमुळें मला जाणवत होतं. मी आंत गेलों. सामळदास शेट मोठा लठ्ठ व ढेरपोट्या मारवाडी होता. त्याचा चेहरा उग्र असून त्याबद्दल आदर वाटण्यासारखा नव्हता. मी आंत गेल्यावर त्यांच्या समोर एका गादीवर बसलों. गिऱ्हाइकें कस्पटाप्रमाणें मानणं हा त्याचा शिरस्ता असावा. कारण गिऱ्हाइकांना टेकण्यास त्यानं लोड ठेवलेलें नव्हतें. त्यांच्या आजूबाजूला खूपशा खातेवह्या पडल्या होत्या. त्यांत कर्जदारांचे जमाखर्च होते. आजूबाजूच्या फळ्यांवर अनेक दस्तऐवज पडलेले होते. प्रो. लिखित्यांनीं आंत शिरतांच आपली कामगिरी सुरू केली होती. त्यांनीं बरेचसे दस्तऐवज उघडून त्यांतल्या ऋणकोंच्या सह्या अदृश्य करून टाकल्या होत्या. त्यामुळें सामळदास शेटला पैसे वसूल करणं अशक्य होणार होतं. त्या नंतर प्रोफेसर साहेबांनीं सामळदास शेटचा दीड लाखाचा चेक नष्ट केला. ही कामगिरी चालू असतां मी सामळदासबरोबर खोटाच सौदा करीत होतों. मला १००० रुपयांची अत्यंत जरूरी आहे व मला तें त्यांनीं व्याजानें द्यावें असं खोटंच अजिजीनें विनवित होतों. आपलं काम संपल्याचं प्रोफेसर साहेबांनीं मला खुणेनं कळविलं; कारण त्यांच्या छत्रीची मूठ दरवाज्यापाशीं घुटमळत होती. शेवटीं आपणाला व्याजाचा दर पटत नाहीं या सबबीवर मी सौदा होणं शक्य नाहीं असं सामळदास यांस सांगून तेथून पाय बाहेर काढला. मोतीबाजारांतून काळबादेवीस आल्यावर आम्हीं दोघेही दृश्य झालों व पुन्हां मोटार करून हिरव्या बंगल्यांत परत आलों. सामळदासच्या पेढींत मात्र खूपच गोंधळ उडाला. संध्याकाळीं वर्तमानपत्रांत याचा उल्लेख आला. शिवाय सामळदासचा

१५०००० चा चेक नष्ट झाल्याचें पाहून सामळदास पंड्या हृदयक्रिया बंद पडून मेल्याची ठळक बातमी छापली होती.

आम्हीं अकराचे सुमारास घरीं आलों होतों तेव्हां त्या बंगल्यांत एकच धांदल उडालेली दिसत होती. कपाटें उघडीं असून त्यांतून मंत्राचीं हवी असलेलीं पुस्तकें, जादूच्या कांड्या, कपडे आणखीन अनेक गोष्टी कपाटांतून आपोआप बाहेर पडत होत्या व एका होल्ड-ऑलमध्यें व्यवस्थित बांधल्या जात होत्या कुठल्यातरी दूरच्या प्रवासाची तयारी होती. कदाचित मी पूर्वी म्हटल्याप्रमाणें जावासुमात्राची अगर काश्मिरची सफर असावी. सर्व सामान भरलं गेलं व मग होल्डऑल बंद झाला. त्याला चामड्याचे नेहमीप्रमाणें पट्टे नव्हते तर एक बारीक पिवळी लांबलचक नागीण त्याला वेटोळे घालीत होती. तिचं नांव 'केतकी' असं होतं. तिनें आपलं डोकं व शेपटी यांची मजबूत गांठ बांधली व तो होल्डऑल आतां पूर्णपणें बांधला गेला.

"साध्या चामडयांच्या पट्टयांपेक्षां आमची केतकी मला फार उपयोगी पडते. एक तर तिची गांठ अतिशय मजबूत असते व दुसरा फायदा म्हणजे कोणीही माझं हें गाठोडं चोरणें शक्य नाहीं. चोरी करणारा बिचारा केतकीच्या विषानं स्वर्गाचा रस्ता धरायचा." प्रोफेसर म्हणाले.

प्रवासाची सर्व तयारी झाली होती. आम्हीं आमचा प्रवास जादूच्या उडत्या सतरंजीवरून करणार होतों. त्यापूर्वी प्रोफेसर लिखिते म्हणाले, " आपणाला आतां खूप उंचावरून जावं लागेल. जवळ जवळ पांच मैल उंचीवरून ! तेव्हां मला तुमच्यावर कांहीं तरी जादूचा प्रयोग करणं जरूर आहे. आपण जेव्हां खूप उंच आकाशांत उडतों

तेव्हां तेथील हवा अत्यंत विरळ होते. तुम्हांला मग वर दुसऱ्या अनेक गोष्टींची जरूरी असते. तुम्हांला शरिरांत रक्ताचा पुरवठा अधिक लागतो व उष्णताही अधिक असावी लागते. त्याशिवाय तुम्हीं जगूं शकत नाहीं. कदाचित तुमच्यासाठीं ऑक्सिजनची पेटी मला घ्यावी लागेल. छे, पण जर त्या पेटीनं व्यवस्थित काम दिलं तर बरं, नाहींतर फजितीच व्हायची. आधुनिक यंत्रांवर माझा खरं म्हणाल तर तसा विश्वासच नाहीं. त्यापेक्षां आपले जुने मंत्रच बरे. मी पेटी बरोबर घेतोच पण माझ्या मंत्राचा प्रयोग मी करून ठेवतों. शिवाय मी एक औषध तुम्हाला देतो. त्याची तुम्हाला फार जरूरी आहे.

एवढं बोलून प्रोफेसर साहेबांनीं अमर यांस हांक मारली व कसलंसं पुस्तक आणायला सांगितलं. अमरनें एक दोन फूट उंचीचा व दीड फूट रुंदीचा ग्रंथ आणला. त्यावर कसलंसं नांव होतं पण लिपी मात्र मला वाचतां येण्यासारखी होती. प्रोफेसर साहेब म्हणाले—ती जुनी पाली लिपि आहे. त्यांनीं त्यानंतर त्या पुस्तकाचं दहा हजार सातशें एकसष्ठावं पान उघडलं. त्यांनीं त्यांना हवा असलेला मजकूर काढला. पुस्तक बंद केलं व आंतून एक औषधांची बाटली व मोटारचा हवा भरण्याचा पंप असावा अशी पिचकारी आणली. आतां ते काय करीत असावे याकडे मी कुतूहलानें पहात होतों. कारण प्रयोग माझ्यावर होणार होता. त्यानीं मला आपला डावा पाय जवळच्या स्टुलावर ठेवण्यास सांगितलं. नंतर त्यांनीं माझा तो पाय हातांत घेऊन स्क्रू सारखा फिरवला व गुडघ्यापासून सुटा केला. मला या गोष्टीचं मोठं आश्चर्य वाटलं. कारण पाय निराळा करीत असतांना मला कोणत्याही प्रकारच्या वेदना झाल्या नाहींत. अगर रक्ताचा एक थेंब सुद्धां जमिनीवर पडला नाहीं. मी त्या सुट्या पायाकडे

पहात होतों. त्यांतलीं हाडें, रक्तवाहिन्या सारं कांहीं स्पष्ट दिसत होतं. प्रो. लिखित्यांनीं त्या पिचकारीनं तें औषध माझ्या मोकळ्या झालेल्या गुडघ्यांतून शरिरांत घातलं मला त्यामुळें एक प्रकारची गम्मत वाटली व सर्व शरिरांत कसल्यातरी सुखद संवेदना झाल्या नंतर माझा सुटा केलेला पाय पुन्हां स्क्रू सारखा नीट बसल्याचें दिसेना. त्यांत थोडीशी फट असावी असं दिसलं. मी मनांतून घाबरलों पण प्रोफेसर साहेबांनीं पुन्हा एक मंत्र म्हणून तो पाय नीट बसवला व माझा पाय पूर्ववत् झाला. तो सुटा झाला होता असं म्हणायला मुळींच जागा नव्हती.

अबदुल मजीद येवढ्यांत आंत आला. त्यानं या खेपेस फारच छान कपडे केले होते. त्यानें हिरवी रेशमी शाल पांघरली होती. व डोक्याला एक मंदील बांधला होता. त्याला मौल्यवान् पांचू होते. पायांत पिवळी साटीनची सुरवर होती व हातांत एक सोन्याचं कडं होतं.

आंत शिरतांच त्यानं प्रोफेसर साहेबास मोठ्या अदबीनं अभिवादन केलं. त्याच्या चेहऱ्यावरून त्याला कांहींतरी बोलायचं असावं असं दिसलं. प्रोफेसर साहेबांनीं तें जाणलं व हंसत हंसत विचारलं.

"मजीद काय पाहिजे आहे तुला?"

"धनिसाहेब माझी एक विनंति आहे. आपला पंकज आहे ना त्यालाही आपणांबरोबर यायचं आहे."

"कांहीं हरकत नाहीं. सध्यां तो व्यवस्थित आहे. त्याचा द्वाडपणा कमी झाला आहे. कांहीं अडचण नाहीं त्याला आपणा बरोबर घ्यायला. पण त्याच्यासाठीं एक शेगडी खरेदी कर आणि त्या शेगडींत बसूंदे त्याला. मात्र शेगडीखालीं अॅसबेसटॉस आंथरायला हवं नाहींतर आपली जादूची सतरंजीच जळून खाक व्हायची."

"बरं असं पहा" ते पुन्हां म्हणाले. "या पाहुण्यांसाठीं एक पॅराशूट आणि लाइफबेल्ट बरोबर घे हं ? सतरंजीवरून हे पडले तर पॅराशूटचा उपयोग होईल पाण्यांत पडले तर लाईफबेल्ट असलेलं बरं."

मी या सर्व वस्तू माझ्याबरोबर घेतल्या. शिवाय प्रो. लिखित्यांनीं दिलेली एक खास जादूची काठी व एक कडें जवळ ठेवलें.

माझा पोशाख एखाद्या लढाईवर जाण्यासाठीं सज्ज झालेल्या सैनिकाप्रमाणें आतां दिसत होता.

अब्दुल मजीद आंत आला. त्यानें हातामध्यें एक सुंदर गालीचा आणला होता. त्यानं तो अर्धवट पसरला. त्यावर सुंदर सुंदर नक्षीकाम होतं. अरबी भाषेंत कांहींतरी लांबलचक लिहिलेलं होतं. मला अरबी भाषा येत नसल्यामुळें तें वाचतां आलं नाहीं. प्रो. लिखित्यांना मात्र अरबी भाषा फार चांगलीच येत होती. त्या पसरलेल्या गालीचावर अब्दुल मजीदनं तो होल्डऑल केतकीच्या विळख्याला धरून उचलून ठेवला. मग पंकजला शेगडीसहीत ठेवलं. मला नंतर प्रोफेसर साहेबांनीं त्यावर उभं रहायला सांगितलं. नंतर त्यांनीं मला थोडावेळ डोळे मिटण्यास सांगितलं. कारण तो गालीचा आतां वर उडणार होता व त्याला पूर्ण वेग येईपर्यंत नवख्या माणसास घेरी येण्याचा संभव होता. आम्ही सर्व त्यावर उभं राहिलों. प्रोफेसर साहेबांनीं सर्वांस विचारलं— "तयार !" आणि आम्हीं एकदम सारेजण उत्तरलों "होय." मी गच्च डोळे मिटून घेतले. क्षणांत आमचा तो गालिचा खिडकींतून बाहेर पडल्याचा मला भास झाला. आम्हीं झपाट्यानं वर वर चाललों आहोंत असं मला कळलं व आतां मला घेरी येणार नाहीं अशी खात्री वाटल्यामुळें मी डोळे उघडले. खालीं पाहिलं तों चौपाटीचं वाळवंट दिसत

होतं. लोकमान्य टिळकांचा पुतळा मला त्या वाळवंटांत स्पष्ट पण बोटाएवढा दिसत होता. अगदीं थोड्या अवकाशांत आम्हीं कुलाब्याची दांडी, खांदेरी उंदेरी बेटं गाठलीं आणि मग आमचा गालिचा ताशीं १८५७ मैल वेगानं उडूं लागला. अरबी समुद्र केव्हांच ओलांडल आम्हीं. हिंदुस्थान सोडून दूर दूर आम्हीं जात असल्याचें पाहून माझें हृदय भरून आलें पण आम्हीं लगेच परत येणार असल्यामुळें मला तें दुःख विसरूनही जाण्यास वेळ लागला नाहीं. शिवाय लहानपणापासून विलायतला जाण्याची माझी फार इच्छा होती पण पैशाच्या अभावीं ती मला या जन्मीं शक्य नव्हती. परंतु प्रो. लिखि-त्यांच्या कृपेमुळें मला विलायत मोफत पाहावयास मिळणार होती व आपला देश अधिक सुधारलेला कीं पाश्चात्य देश अधिक शहाणा हें पहाण्याची संधि प्रोफेसर साहेबांमुळें मला प्राप्त झाली याबद्दल मी त्यांचे मनांतल्या मनांत आभार मानीत होतों. वाऱ्याचा जोर उलट दिशेनें सारखा वाढत होता. व त्यामुळें आमच्या गालीच्याचा वेग वाढ-ल्याचें मला समजून येत होतं. प्रोफेसर साहेब म्हणाले–आपण आतां ताशीं १९४२ मैलानें जात आहोंत. मला हें ऐकून आश्चर्यच वाटलं. जगांतलं कोणतंही विमान इतक्या वेगानं चालणं शक्य नाहीं.

एकाएकीं आमचा वेग मंदावला. अबदुल मजीदची धांदल उडाली. प्रोफेसर साहेब देखील जरा अस्वस्थ झाले. कांहींतरी धोका अगर अपघाताचा संभव आहे असं मला वाटलें आणि ती गोष्ट खरी होती. कारण आमच्या समोरून एक अक्राळ विक्राळ राक्षस येत होता राक्षसांच्या मी अनेक गोष्टीं ऐकल्या होत्या पण प्रत्यक्ष पहाण्याचा तो माझा पहिलाच प्रसंग होता. त्याचा रंग काळा कभिन्न असून तो मला

एखाद्या पावसाळीं ढगासारखा दिसला. प्रोफेसरसाहेब म्हणाले कीं, या भागांत अशा राक्षसांचा फारच उपद्रव आहे. हे राक्षस समुद्रांतील जहाजें बुडवतात आणि आकाशांत संचार करणारीं विमानं पाडून टाकतात. त्यांचं खरं खरं रूप साधारण माणसाला दिसत नाहीं. लोक मग त्याला वादळ म्हणतात, तुफान म्हणतात. तुम्हीं या जादुच्या गालिच्यावर आहांत म्हणून त्याच स्वरुप तुम्हांला दिसतंय या राक्षसा पासून आपणाला कांहीं त्रास व्हायचा नाहीं कारण माझ्या हातांत ही जी जादूची काठी आहे ती त्याच्याकडे दाखविली की तो मरून जाईल.. राक्षस झपाट्यानें आमच्याकडे येत होता. माझ्या गळ्यातलं कडं मला प्रोफेसर साहेबानीं संभाळण्यास सांगितलं व ते तोंडानें मंत्र म्हणू लागले. मला या संकटानें खूपच भिती वाटली. व आपण आपल्या प्रिय मातृभूमीस परत कसें जाऊं या भयंकर विचारानें माझं अंतःकरण दुःखी झालं. तो राक्षस आमच्या बराच जवळ येऊं लागला. त्याचा जबडा भयंकरच मोठा होता. त्याची लंबी जवळ जवळ तीन मैल होती. आणि त्याचा श्वासोच्छास एखाद्या गडगडणाऱ्या मेघांप्रमाणें वाटत होता. आमचा गालीच्या चांगलाच हेलकावे खाऊं लागला आतां त्या राक्षसाची व प्रोफेसर साहेबांची चांगलीच्च झटापट उडणार असा रंग दिसूं लागला. त्या राक्षसाला वाटलं नेहमी प्रमाणेंच्च येणाऱ्या सावजापैकीं हेंही एक असावं. पण त्याचा अंदाज चुकला. प्रोफेसर साहेबांच्या मंत्रानं त्यांची दाणादाण उडाली व डोळ्यांचें पात लवतं न लवतं तोंच त्या राक्षसाचा आकार बदलूं लागला. त्याचं भलं मोठं शरिर बारीक बारीक दिसूं लागलं व तो भयंकर राक्षस थोड्या वेळांत एखादा ढग वितळून जावा तसा वितळून गेला. मला हायसं वाटलं

आतां आम्हीं अरेबियाच्या बाजूला आलों होतों. खाली सर्व प्रदेश वालुकामय दिसत होता. तांबड्यालाल वाळूचे डोंगर आणि खळगे सर्वत्र दिसत होते. एखादं खजुरीचं झाड अगर थोडीशी हिरवळ कुठं कुठं दिसायची.

आमच्या उडत्या गालीच्याचा वेग थोडा कमी करून आम्हीं बरेच खाली आलों. आतांपर्यंत आम्हीं आकाशांत खूप उंचावरून म्हणजे ४००० फूटावरून उडत होतों. परंतु प्रो. साहेबांनीं मुद्दामच आमचा गालीचा बराच खालीं आणला होता. कुठंतरी एक सुंदर शहर आम्हांला दिसलं. मुसलमानी पद्धतीच्या इमारती तिथं दिसत होत्या. मशिदी आणि इस्लामी पद्धतीचे मनोरे खूप दिसत होते. रस्त्यावर दाढीवाली आणि बुरखा घेतलेलीं माणसं फिरत होतीं. रस्ते अरुंद असून मधून मधून उंटाचे काफिलेही फिरतांना दिसत. रस्त्यावर मांस आणि फळं ठिकठिकाणीं विकलीं जात होतीं. मी अबदुल मजीदला हळूच तें कोणतं शहर म्हणून विचारलं तेव्हां तो म्हणाला 'बगदाद."

प्रो. लिखित म्हणाले "बगदाद शहर गालिच्याबद्दल फार प्रसिद्ध आहे. आपण ज्या गालिच्यावरून आतां प्रवास करीत आहोंत ना, तो देखील मी येथूनच घेतला. ती तिकडे पांढरी मशिद दिसते ना, तेथल्या अवलीयानं तो मला दिला आहे."

"बगदादचा सुप्रसिद्ध चोर इथंच होऊन गेला नाहीं?" मी विचारलं.

"होय इथलाच तो. त्यांची सतरंजी फारच छान होती. तिचा वेग तासाला २००० मैलपर्यंत होता. तशी सतरंजी आता मिळणे शक्य नाहीं." प्रोफेसर म्हणाले.

"पण त्या सतरंजीचा उपयोग चोरी करण्यासाठींच करीत असे ना तो ?" मी प्रश्न केला.

"नाहीं" प्रोफेसर जरा रागांतच म्हणाले.

"त्याचा उपयोग तो श्रीमंत माणसांना लुटून पैसे वाटण्यासाठी करीत असे."

"मग त्या सतरंजीचं काय झालं?" अबदुल मजीद म्हणाला.

"ती सतरंजी लबाडीनं गोऱ्या माणसानं पळवून नेली. गोरी माणसं लुटारू आणि कावेबाज म्हणून प्रसिद्धच आहेत !"

"मग काय झालं ?" आम्ही विचारलं.

"काय होणार ! ती सतरंजी त्यानं नेली. पण त्याचा उपयोग त्याला नीट करतां आला नाहीं. त्यावरील मंत्र त्याला वाचतां येईना व शेवटीं अडगळीची वस्तु म्हणून एकदा त्याच्या बायकोनं ती समुद्रांत फेकून दिली."

बोलण्याच्या भरांत आम्हीं कुठं आलों तें समजायला मार्ग नव्हता. बगदाद शहर केव्हांच मागं पडलं होतं. आतां आम्हांला खूप थंडी वाजूं लागली. प्रोफेसर साहेबांनीं आपल्या हातांतली जादूची काठी आमच्या अंगावरून फिरवली व आमचे साधे सुती कपडे चांगले लोकरीचे झाले नि माझ्या अंगांत चांगलीच ऊब आली. आतां आम्हीं सुवेझ कालव्यावरून जात होतों. कालव्यांतून एक मोठी बोट हळूहळू चालली होती. सुवेझचा कालवा मागे पडून आम्हीं भूमध्यसमुद्रांत आलों. भूमध्य समुद्रांत अनेक जहाजें फिरतांना दिसत होतीं. आमच्या उजव्या हाताला जिब्राल्टर दिसत होतें व ब्रिटिशांच्या जगप्रसिद्ध आरमारांतील कांहीं भव्य लढाऊ जहाजें येथें टोंकयांत नांगर टाकून पहारा करीत होतीं.

आमचा विचार सरळ लंडनकडे जाण्याचा होता पण मी प्रोफेसर साहेबांस इटली, जर्मनी, स्वित्झरलंडवरून जाऊं असं म्हटलं व त्यांनी तें आनंदानं कबूल केलं. आम्हीं आमच्या उडत्या गालीच्याची दिशा जरा बदलली. युरोपमध्यें आल्यामुळें मी मोठ्या कुतहलानें खालीं पहात होतों. आम्हीं अगदीं खालून चाललों होतों. युरोपांतील महत्वाचीं शहरं आणि गांवें आम्हांला स्पष्ट दिसत होतीं. मात्र लोकांना आम्हीं दिसत नव्हतों. कारण आम्हीं जादूच्या गालीच्यावर होतों.

"हे पहा कॉर्सिका बेट" प्रोफेसर म्हणाले.

"नेपोलियनचा जन्म येथेंच झाला ना?" मी म्हणालों आणि "होय", असं प्रोफेसर म्हणाले. जगांतल्या एका थोर देशभक्ताच्य जन्मभूमीचें दर्शन झाल्याचें पाहून माझं हृदय आनंदानं उचंबळून आलं त्यानंतर आम्हीं ग्रीसवर उडालों. शिकंदरचा देश होता तो. रोम पाहिलं पण त्यावर प्रेतकळा पसरलेलीं दिसत होती. लढाईंत पूर्ण जखमी झालेल्या मृत शिपायासारखी त्याची स्थिति दिसत होती. दोन एक मिनिटांत आम्हीं जर्मनींत प्रवेश केला. ठिकठिकाणीं 'युनिअन जॅक' आणि अमेरिकेचीं निशाणं दिसत होतीं. जर्मन देश जरी पराभूत झाला होता तरी तिथले लोक उदास दिसत नव्हते. रोमन लोकांत आणि बर्लिनच्या रहिवाश्यांत जमीन अस्मानचा फरक दिसत होता. आतां आम्हीं इंग्लिश खाडींत आलों होतों. इंग्लीश खाडींत वादळ झाल्याचं दिसत होतं. खाडी लहानशी असली तरी भयंकर दिसत होती. या असल्या खाडींतून बॅरिस्टर सावरकर चालत्या बोटींतून उडी मारून पोहून फ्रान्सला कसे गेले याचं मला नवल वाटलं. कारण त्या खाडीच्या प्रचंड लाटा आणि खडकाळपणा प्रत्यक्ष हिंदी महासागरांत अगर पॅसिफिक महासागरांत देखील तुम्हांला दिसणार नाहीं.

क्षणार्धांत आम्हीं लंडनला आलों. थेम्स नदी, वेस्टमिनिस्टर ॲबे, सेंटपॉल्स कॅथड्रल, बकींगहॅम पॅलेस वगैरे इमारती स्पष्ट दिसूं लागल्या. हां हां म्हणतां आम्हीं डाऊनिंग स्ट्रीटवरील एका सुंदरशा इमारतीच्या गच्चीवर येऊन दाखल झालों. आमचा गालीचा, होलडॉल व पंकज आम्हीं तेथेंच ठेवून अबदुल मजीद व प्रोफेसर साहेब यांचेसह मी खालच्या मजल्यावर आलों. तो सर्व मजला प्रो. मॅकिनटॉश या इंग्रज गृहस्थांचा होता. हे गृहस्थ प्रोफेसर लिखित्यांचे जानी दोस्त होते. प्रोफेसर साहेबांना पहातांच त्यांनीं त्यांचें व आम्हां सर्वांचें मोठ्या कळकळीनें स्वागत केलं. आम्हीं त्या सुंदर सजविलेल्या दिवाणखान्यांत बसलों. त्यावेळीं साधारण दीड दोनाचा सुमार झाला होता. अर्थात् ती जेवण घेण्याचीच वेळ होती. प्रो. मॅकिनटॉश यांनीं आम्हांला जेवणास उठण्यास सांगितलें. जेवणाच्या खोलींत आम्हीं गेलों व प्रो. मॅकिनटॉश यांनीं आम्हांला टेबलावर बसण्यास सांगितलें. टेबलावर आंथरलेल्या सफेत कपड्याशिवाय कांहीं नव्हतं पण दोन एक मिनिटांत प्रो. मॅकिनटॉश यांनीं आंत जाऊन एक निळा रुमाल आणला व तो आमच्या प्रत्येकाच्या पुढ्यांत नुसता झटकला. त्या बरोबर हिंदी-पद्धतीचीं ताटं, वाट्या, चमचे आमच्या पुढ्यांत दिसूं लागले. प्रो. मॅकि-नटॉश देखील प्रो. लिखित्यांसारखेच जादूगार आहेत याची मला कल्पना नव्हती. प्रो. मॅकिनटॉश नंतर. तोंडानें कांहींसे बडबडले व त्यांनीं एक लांब शीळ घातली आणि काय आश्चर्य ! चार पांच हिंदी स्त्रियांचा एक तांडा आंत आला व त्यांनीं भराभर आमच्या ताटांत जेवणाचे पदार्थ वाढायला सुरवात केली. भात, पुऱ्या, लाडू, जिलब्या, शिरा इतकंच काय पण पापड लज्जतदार मज्जा देखिल मिळाला आम्हांला. जेवण

भरपूर झालं. प्रो. लिखित्यांनीं माझी प्रोफेसर मॅकिनटॉश यांच्याशीं ओळख करून दिली. प्रो. लिखिते व मॅकिनटॉश हे अगदीं जिवलग दोस्त होते. मग बाहेरच्या दिवाणखान्यांत आमच्या गप्पा झाल्या. केतकीसाठीं थोडं दूध, पंकजसाठीं गंधकाचे खडे व पाण्याच्या ग्लासांत सफेत फॉस्फरस अबदुल मजीद घेऊन गेला कारण ते दोघे फारच भुकेलेले होते.

प्रो. मॅकिनटॉश यांच्याकडे एकदोन बडे पाहुणे यावेळीं आले होते. त्यांना प्रोफेसर लिखित्यांनीं कांहींतरी जादूचा प्रयोग दाखवावा अशी प्रोफेसर मॅकिनटॉश यांनीं विनंती केली ! प्रोफेसर लिखित्यांनीं तें कबूल केलें. त्यांनीं साधारण अर्धा इंच जाडीचा एक दोर घेतला व तें वेटोळें त्यांनीं जमिनीवर ठेवलें. तोंडानें त्या दोराचं एक टोंक सरसर वर चढूं लागलं व तक्तपोशीपर्यंत जाऊन उभं राहिलं. मात्र तक्तपोशीला तें लागलं नाहीं. मग त्या दोरावर अबदुल मजीद चढला. त्यानें मलखांबाचे प्रयोग करून दाखवले. दोर अधांतरीं राहून त्यावर एका माणसानं अशा तऱ्हेच्या उड्या माराव्या हा एक अद्भुत चमत्कार होता. त्या चमत्काराचें सर्वांनीं टाळ्या पिटून स्वागत केलं. हिंदुस्थानांत अशा प्रकारचे जादुगार आहेत हें पाहून त्या पाहुण्यांना मोठं समाधान वाटलं व त्यांनीं प्रोफेसर लिखित्यांचा गौरव केला.

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. एवढ्यांत तीन वाजल्याचें घड्याळानें ठोके देऊन सांगितलं. आम्हांला परत हिंदुस्थानांत यावयाचं होतं. काळोख पडण्यापूर्वीं घरीं पोहोंचणं आम्हांला जरूर होतं. अर्थात् आम्हीं सर्वांचा निरोप घेऊन निघालों. गच्चीवर येऊन गालीच्यावर उभे राहिलों. गालीच्यांनीं भरारी मारली व हिंदुस्थानच्या

मार्ग धरला. प्रोफेसर मॅकिनटॉश व त्यांचे मित्र आपले हातरुमाल उंचावून आम्हांला निरोप देत होते. प्रोफेसर लिखित्यांच्या मनांत मला आज सारं जग दाखवायचं होतं. पण मी प्रवासानं थकल्याचें व घरीं जाण्यास आतुर झाल्याचें पाहून त्यांनीं आपला बेत बदलला.

आमचा गालीचा प्रचंड वेगानं चालला होता. बिनतारी यंत्राच्य लहरी, रेडिओच्या लहरी आम्हांला अडथळा उत्पन्न करतील म्हणून आम्हीं खूप उंचावरून चाललों होतों. मी खालीं पाहिलं तों सारे देश मला ठिपक्याप्रमाणें दिसत होते. थंड प्रदेश सोडून आम्हीं उष्ण प्रदेशांत आलों होतों व आमचे लोकरीचे गरम कपडे आतां प्रोफेसर साहेबांच्या जादूच्या कांडीनं रेशमाचे झाले होते. साडे पांच सहाचा सुमार झाला असेल आम्हीं कराचीस आलों. व दोन चार मिनिटांतच मुंबई गांठली आणि प्रोफेसर साहेबांच्या घरीं येऊन दाखल झालों.

प्रवासाचा शीण घालविण्यासाठीं प्रोफेसर लिखित्यांनीं मला कॉफी वगैरे घेऊन जाण्यास सांगितलें व त्यासाठीं आम्हीं वरच्या मजल्यावर जेवणाच्या खोलींत गेलों तों एक मनुष्य प्रोफेसर साहेबांच्या खास तिजोरीच्या खोलीच्या दाराशीं अगदीं रडकुंडीस येऊन उभा असलेला दिसला, पण आम्हांला पाहातांच त्याला पळून जाण्याची इच्छा असतांना देखील त्याला तसें करतां आलें नाहीं. कारण त्याचें नाक दाराच्या कडीला चिकटल्याचें दिसत होतें. त्यानें प्रथम पळण्याचा प्रयत्न केला असावा; कारण त्याचं नाक साधारणपणें तीन फूट लांब सोंडेसारखं झालं होतं व रबरासारखं ताणलं होतं. त्यानं जर अधिक पळून जाण्याचा प्रयत्न केला असता तर त्याचं नाक लांब लांब होत

गेलं असनं पण दरवाजाला चिकटलेलंच राहिलं असत. त्यानं शहाणपणा केला व तो तेथेंच प्रो. लिखित्यांची वाट पहात राहिला. प्रो. लिखित्यांनीं ओळखलं. तो एक चोर होता व प्रोफेसर साहेब घरीं नाहींत ही संधी साधून त्यानें डल्ला मारावयाचा विचार केला होता; पण आमचे प्रोफेसर साहेब पडले जादुगार. त्यांनीं चोराची चांगलीच खोड मोडली. त्या चोरानें प्रोफेसर साहेबांची क्षमा मागितली. त्यानं अगदीं गयावया करून क्षमा मागितली. प्रोफेसर साहेबांनीं त्याच्याकडून यापुढं कधींही चोरी करणार नाहीं, पोटासाठीं मेहनत करीन अशी कबूली करून घेऊन त्याला सोडून दिलं. त्याचं तें सोंडेसारखं लांब नाक पूर्वींप्रमाणें झालं. चोरानं प्रोफेसर लिखित्यांना नमस्कार केला व धूम ठोकली.

मी कॉफी घेतली. प्रोफेसर साहेबांचे आभार मानले व घरीं आलों. इतक्या लांबचा प्रवास केल्यामुळें जणू काय पांच सहा महिन्यांनीं मी घरीं आलों आहे असं मला वाटलं, पण घड्याळांत पाहिलं तों साडेसहाच झाले होते. अवघ्या दहा तासांत मी हजारों मैलांचा प्रवास करून घरीं परतलों होतों.

प्रो. लिखित्यांनीं पुन्हा एकदां मला त्यांच्या घरीं बोलाविलं आहे. मी जाणार आहे. त्यांच्या घरीं गेलं कीं, नवीन नवीन गंमती जमती पाहायला मिळतात.

त्या नवीन गंमती जंमती लवकरच मी तुम्हांला सांगणार आहे. तोपर्यंत धीर धराल ना?

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 236 नों. दि. ........
वि. ........ क्र. ........

# आमचें बाल-वाङ्मय.

## किंमत प्रत्येकीं ४ आणे

१ कांचन गंगा २ रुपेरी किरण ३ सात तारका ४ जादूचा घोडा
५ अजित कुमार ६ रत्नकंकण ७ गाराचा पाऊस
८ वानरांची सर्कस ९ रोझा १० पिंजऱ्यांतील प्राणी
११ चिमण्यांची चित्रविचित्र

---

## किंमत प्रत्येकीं ५ आणे

१ आई २ निळें आकाश ३ सवाई विक्रम ४ गंपूदादाचा लाकडदंड्या
५ पालवी ६ हिरवा पक्षी ७ शेतकऱ्यांची मुलें ८ लाडका भाऊ
९ तीन पण व इतर गोष्टी १० चतुर तुतारीवाला
११।१२ चिमण्या कळ्या (भाग १।२) १३ विलक्षण
चांभार १४ सुनंदा १५ लहानपणच्या
आठवणी १६ तान्या आणि वान्या
१७ जादूचा मंत्र

---

## किंमत प्रत्येकीं ६ आणे

१ प्रवासी गलिव्हर २ मजेदार कथा ३।४।५ नूतन नीतिकथा
भाग (१ ते ३) ६।७।८ आप्पांच्या गोष्टी भाग (१ ते ३)

---

## किंमत प्रत्येकीं ८ आणे

१ विक्रमाची साडेसाती २ एका रात्रींत देऊळ ३।४ विरंगुळा
भाग (१।२) ५ ते ११ सुलभ महाभारत भाग (१ ते ७)

महाराष्ट्र-ग्रं ... ४.

IRBK-0102386

IRBK-0102386

## बालवाचकांकरितां आमचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | आई ( माधव कामत ) | ०—५—० |
| २ | विक्रमाची साडेसाती ( ताराबाई मोडक ) | ०—८—० |
| ३ | जादूचा घोडा ( ,, ) | ०—४—० |
| ४ | सवाई विक्रम ( ,, ) | ०—५—० |
| ५ | गारांचा पाऊस ( शं. रा. देवळे ) | ०—४—० |
| ६ | गंपूदादाचा लाकडदांड्या ( ताराबाई मोडक ) | ०—५—० |
| ७ | वानरांची सर्कस (वसंत वैद्य ) | ०—४—० |
| ८ | प्रवासी गलिव्हर ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—६—० |
| ९ | तीन पण व इतर गोष्टी ( बेंबळकर ) | ०—५—० |
| १० | चतुर तुतारीवाला ( बेंबळकर ) | ०—५—० |
| ११ | अजित कुमार ( ताराबाई जाधव ) | ०—४— |
| १२ | रत्नकंकण ( ,, ) | ०—४— |
| १३ | पालवी ( वसंत वैद्य ) | ०—५—० |
| १४ | मजेदार कथा ( यदुनाथ थत्ते ) | ०—६— |
| १५ | नूतन नीतिकथा भा. १ ( गो. वा. पंडितराव ) | ०—१०—० |
| १६ | ,, ,, २ ( ,, ) | ०—१०—० |
| १७ | हिरवा पक्षी ( दीनानाथ म्हात्रे ) | ०—५—० |
| १८ | चिमण्या कळ्या भाग १ ( मालतीबाई दांडेकर ) | ०—५—० |
| १९ | चिमण्या कळ्या ,, २ ( ,, ,, ) | ०—५—० |
| २० | सुनंदा ( अक्कलकोटकर ) | ०—५—० |
| २१ | एका रात्रींत देऊळ ( यदुनाथ थत्ते ) | ०—८—० |
| | सुलभ महाभारत भाग १ ते ६ प्रत्येकी | ०—८—० |

## शिशुसाहित्य

| | | |
|---|---|---|
| १ | कांचनगंगा ( सौ. वाळिंबे ) | ०—४—० |
| २ | निळें आकाश ( ,, ) | ०—५—० |
| ३ | रुपेरी किरण ( ,, ) | ०—४—० |
| ४ | सात तारका ( ,, ) | ०—४—० |

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.